## महागृहनिर्माण योजना -२०१८ ची प्रतीक्षायादी-२, महागृहनिर्माण योजना – २०१९, स्वप्नपूर्ती गृहनिर्माण योजना व व्हॅलीशिल्प-एनआरआय गृहनिर्माण योजनेमधील अर्जदारांना अपील संदर्भातील सूचना

### 1) ऑनलाईन अपील करून पूर्ण कागदपत्रे जमा केलेले अर्जदार: -

ज्या अर्जदारांनी ऑनलाईन अपील केलेले आहे व कागदपत्रे सिडको निवारा केंद्र येथे जमा केलेली आहेत. अशा अर्जदारांच्या कागदपत्रांची पडताळणी करून निकाल जाहीर करण्यात येईल. **अर्जदारांनी आपला अर्ज क्रमांक (ऑनलाईन अपील करून पूर्ण कागदपत्रे जमा केलेले अर्जदारांची यादी) या लिंकवर पहावा.**

### २) ऑनलाईन अपील केलेले परंतु सिडको निवारा केंद्र येथे कागदपत्रे जमा करणे आवश्यक नसलेले अर्जदार:

ज्या अर्जदारांनी ऑनलाईन अपील केलेले आहे परंतु त्यांनी सिडको निवारा केंद्र येथे कागदपत्रे जमा करणे आवश्यक नाही अशा अर्जदारांच्या कागदपत्रांची पडताळणी करून निकाल जाहीर करण्यात येईल. **अर्जदारांनी आपला अर्ज क्रमांक (ऑनलाईन अपील केलेले परंतु सिडको निवारा केंद्र येथे कागदपत्रे जमा करणे आवश्यक नसलेल्या अर्जदारांची यादी ) या लिंकवर पहावा.**

### ३) ऑनलाईन अपील केलेले परंतु सिडको निवारा केंद्र येथे कागदपत्रे जमा न केलेले अर्जदार : -

ज्या अर्जदारांनी ऑनलाईन अपील केलेले आहे परंतु सिडको निवारा केंद्र येथे कागदपत्रे जमा केलेली नाहीत. अशा अर्जदारांना कागदपत्रे जमा करण्यासाठी दि.१५/०८/२०२० पासून दि. ३१/०८/२०२० पर्यंत शेवटची संधी देण्यात येत आहे. जे अर्जदार या कालावधीत कागदपत्रे जमा करणार नाहीत अशा अर्जदारांची कागदपत्रे सदर कालावधीनंतर कोणत्याही सबबीवर जमा करून घेतली जाणार नाहीत. तसेच असे अर्ज अपात्र घोषित करण्यात येतील याची अर्जदारांनी नोंद घ्यावी. **अर्जदारांनी आपला अर्ज क्रमांक (ऑनलाईन अपील केलेले परंतु सिडको निवारा केंद्र येथे कागदपत्रे जमा न केलेल्या अर्जदारांची यादी ) या लिंकवर पहावा.**

### ४) ऑनलाईन अपील केलेले व सिडको निवारा केंद्र येथे अपूर्ण कागदपत्रे जमा केलेले अर्जदार :

ज्या अर्जदारांनी ऑनलाईन अपील केले आहे परंतु सिडको निवारा केंद्र येथे अपूर्ण कागदपत्रे जमा केलेली आहेत. अशा अर्जदारांना कागदपत्रे जमा करण्यासाठी दि.१५/०८/२०२० पासून दि. ३१/०८/२०२० पर्यंत शेवटची संधी देण्यात येत आहे. जे अर्जदार या कालावधीत कागदपत्रे जमा करणार नाहीत अशा अर्जदारांची

कागदपत्रे सदर  कालावधीनंतर कोणत्याही सबबीवर जमा करून घेतली जाणार नाहीत. तसेच असे अर्ज अपात्र घोषित करण्यात येतील  याची अर्जदारांनी नोंद घ्यावी. **अर्जदारांनी आपला अर्ज क्रमांक (ऑनलाईन अपील केलेले व सिडको निवारा केंद्र येथे अपूर्ण कागदपत्रे जमा केलेल्या अर्जदारांची यादी ) या लिंकवर पहावा.**

## ५) ऑनलाईन अपील न केलेले अर्जदार : -

ज्या अर्जदारांनी ऑनलाईन अपील केलेले नाही अशा अर्जदारांना  ऑनलाईन अपील करण्यासाठी व कागदपत्रे जमा करण्यासाठी दि.१५/०८/२०२० पासून दि. ३१/०८/२०२० पर्यंत शेवटची संधी देण्यात येत आहे.  जे अर्जदार या कालावधीत ऑनलाईन अपील करणार नाहीत व कागदपत्रे जमा करणार नाहीत अशा अर्जदारांची कागदपत्रे सदर  कालावधीनंतर कोणत्याही सबबीवर जमा करून घेतली जाणार नाहीत. तसेच असे अर्ज अपात्र घोषित करण्यात येतील  याची अर्जदारांनी नोंद घ्यावी.**अर्जदारांनी आपला अर्ज क्रमांक (ऑनलाईन अपील न केलेल्या अर्जदारांची यादी)  या लिंकवर पहावा**.

**ज्या अर्जदारांनी  कागदपत्रे जमा करावयाची आहेत अशा अर्जदारांनी सदर कागदपत्रे सिडको निवारा केंद्र पत्ता टी - २७१, आठवा मजला, टॉवर क्रमांक - १०, बेलापूर रेल्वेसंकुल, बेलापूर, नवी मुंबई येथे जमा करावीत. सिडको कार्यालय, रायगड भवन येथे व्यक्तिश: किंवा पोस्टाने पाठवलेली कागदपत्रे पुढील कार्यवाही साठी ग्राह्य धरली  जाणार नाहीत. तसेच या संदर्भातील संपूर्ण जबाबदारी अर्जदारांची राहील.**

**वरील नमुद यद्यांमधील जे अर्जदार ऑनलाईन अपील करतील व कागदपत्रे जमा करतील अशा अर्जदारांची यादी दुसऱ्या दिवशी  सिडको निवारा केंद्र संकेतस्थळावर येथे प्रसिद्ध करण्यात येईल. अर्जदारांनी यादी तपासून आपल्या नावाची खात्री करून घ्यावी. तसेच त्याबाबत काही शंका असल्यास सिडको निवारा केंद्र हेल्पलाइन  क्र . 022-62722250 वर संपर्क साधावा किंवा सिडको निवारा केंद्र येथे भेट द्यावी. दि. ३१/०८/२०२० नंतर कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.**

**सावधानतेचा इशारा :-**

सिडको महामंडळाने या योजनेतील सदनिकांच्या वितरणासाठी किंवा याबाबतच्या कोणत्याही कामासाठी कोणालाही प्रतिनिधी/सल्ला देणारा वा प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदारांनी कोणत्याही अनधिकृत व्यक्तीशी परस्पर पैशांचा व्यवहार केल्यास त्याला सिडको जबाबदार राहणार नाही. तसेच अर्जदारास कोणी दलाल व्यक्ती  परस्पर अर्ज विक्री किंवा सिडकोच्या नावे पैसे उकळणे किंवा फसवणूक करणे इ. बाबी करताना आढळल्यास सिडकोच्या पणन व्यवस्थापक (पणन-2) यांचे कार्यालयास कळवावे.